परिपत्रक

विषय - महाकृषी एस.एम एस सेवेत शेतकरी नोंदणी करण्याकरीता यादया पाठविण्या बाबत....

संदर्भ - क्र.१.संचालक फलोत्पादन यांचे परिपत्रक जा.क्र/सं.प्र/एसएमएस सेवापरिपत्रक १२४/२०११ दिनांक २०/७/२०११.

क्र.२.संचालक विस्तार व प्रशिक्षण कृषि आयुक्तालय म.रा.पुणे-१ यांचे परिपत्रक जा.क्र/उसंपिसं/विप्र-७/क्रॉपसॅप/११-१२/ प्रक्र-०८/९८९/२०११ दिनांक २०/७/२०११

उपरोक्त संदर्भानुसार **महाकृषि एसएमएस सेवेतंर्गत शेतकरी नोंदणी करण्याकरीता** विशेष मोहिम हाती घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.या अंतर्गत आतापर्यंत ४०,००० शेतकर्यांची नोंद करण्यात आली आहे.

तथापी,क्षेत्रिय स्तरावरुन एसएमएस सेवेत अंतर्भूत करण्याकरीता प्राप्त होणार्या० यादयामध्ये त्रुटी आढळून येत आहेत.त्यामुळे शेतकरी सभासदांची एसएमएस सेवेमध्ये नोंद करण्याकरीता अडचणी उदभवत आहेत.त्या अनुषंगाने खालील मार्गदर्शन सुचनेनुसार आवश्यक नोंद घेण्यात यावी.

एस.एम.एस.सेवेत अंतर्भूत करण्याकरिता शेतकरी डेटाबेस पाठविण्याबाबत मार्गदर्शक सूचना.

- मराठी संमती प्रपत्रात शेतकरी यांची संमती घेवून क्षेत्रीय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले प्रपत्र कार्यालयात जपून ठेवावे.
- इंग्रजी प्रपत्रात (एक्सेल शिट)माहिती भरून कृषि आयुक्तालयास ईमेल द्वारे पाठविण्यात यावी.

  इ मेल - **ddproject@rediffmail.com**
- एक्सेल शिट मध्ये सर्व माहिती देण्यात यावी.प्रपत्राचा कोणताही स्तंभ कोरा सोडू नये.
- माहिती एरियल फॉन्ट मध्ये देण्यात यावी.
- शेतकर्यारचे नाव देतांना नाव,वडिलांचे नाव,आडनाव या क्रमाने द्यावे.
- सर्व नाव एकाच सेल मध्ये लिहावे.तीन स्वतंत्र सेल मध्ये लिहू नये.
- मोबाइल नंबर हा दहा आकडी असावा.या स्तंभामध्ये लँडलाइन फोन चा नंबर देवू नये.

- पिकांची निवड सोबतच्या 43 पिकांमधून करावी.स्पेलिंग चुकू नये म्हणून सोबतचे स्पेलिंगच वापरावेत.

  (Amla, Bajri, Banana, Ber, BlackGram, Cashew, Chikoo, Coconut, Cotton, CustarApple, Fig, Flowers, Ginjar, Grams, Grapes, Ground Nut, Guava, Horticulture, Jowar, Lemon, Maize, Mango, Milet, Mosambi, Mug, Onion, Orange, Other Fruit, Paddy, Papaya, Pea, Pomegranate, Potato, Sunflower, Tamrind, Tomato, Tur, Udid, Vegtable, Wheat.)

- या माहितीमध्ये रिकाम्या सेल मध्ये कोणत्याही विशेष चिन्हांचा (like #, -, ---, 0,) वापर करू नये.
- संपूर्ण तक्त्यात कोठेही पूर्णविराम (.),अर्धविराम (,)ई चा वापर करू नये.

यासंदर्भात आवश्यक नोंद घेवुन सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांना सूचना दयाव्यात् .केलेल्या कार्यवाहीचे अनुपालन अर्ध शासकीय पत्राने पाठविण्यात यावे.

स्वाक्षरित-
संचालक फलोत्पादन
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य
पुणे - ४११ ००५

जा.क्र/सं.प्र/सीयुजी/परिपत्रक/१८४/२०११
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे - ४११ ००५
दिनांक - १९/०९/२०११

माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाही साठी.

प्रति,

१) विभागीय कृषि सहसंचालक (सर्व.)

२) जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व)

माहीतीस्तव सविनय सादर.

१. मा.प्रधान सचिव,कृषि व फलोत्पादन,महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई ३२.

२. मा.आयुक्त कृषि,महाराष्ट्र राज्य पुणे-४११००१.